महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर यांचे कार्यालय

## (वनहक्क शाखा)

पार्श्वनाथ ९, जिल्हाधिकारी कार्यालय (विस्तारीत इमारत), बिडको रोड, ता. जि. पालघर
दूरध्वनी क्रमांक 02525-253111 Email id : collectorpalghar@gmail.com

क्र. महसुल/वनहक्क/कावि-९९८/2018 दि.03.12.2018

जिल्हास्तरीय वनहक्क समिती, पालघर व उपविभागस्तरीय वनहक्क समिती पालघर, वसई, वाडा, जव्हार, डहाणू येथे वनहक्कशाखेत वनहक्क सहाय्यक या पदासाठी मानधन तत्त्वावर कंत्राटी पध्दतीने नेमणूकीसाठी थेट मुलाखत **(Walk-in -Interview)**

## जाहीर सूचना

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०१२ नुसार जिल्हास्तरीय वनहक्क समिती, पालघर -३ व उपविभागस्तरीय वनहक्क समिती पालघर-१, वसई-१, जव्हार-१, डहाणू-२, व वाडा-२ अशा एकूण १० पदासाठी नेमणूक करणेची आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथील वनहक्क कायदा अंमलबजावणीकामी मानधन तत्वावरील वनहक्क सहाय्यक या पदाची नियुक्ती थेट मुलाखतीव्दारे (Walk-in -Interview) करण्यात येणार आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी अर्जासह थेट मुलाखतीसाठी (Walk-in -Interview) दिनांक - ११.१२.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे उपस्थित रहावे.

**शैक्षणिक पात्रता :-**

१. शासनमान्य विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर
२. इंग्रजी टंकलेखन ४०, व मराठी टंकलेखन ३०
३. MS-CIT (शासनमान्य प्रमाणपत्र)
४. संगणकाचे ज्ञान आवश्यक
५. वनहक्क कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.

**निवड पध्दती :-**

१. जाहिराती नमूद आवश्यक उमेदवारांची थेट मुलाखत (Walk-in -Interview) पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल.
२. एकूण १०० गुणांची मुलाखत असेल.
अ. पदवीसाठी ३० गुण दिले जातील.
ब. इंग्रजी टंकलेखन ४०, व मराठी टंकलेखन ३० साठी २० गुण देण्यात येतील.
क. MS-CIT (शासनमान्य प्रमाणपत्र) यासाठी २० गुण देण्यात येतील.
ड. सामान्य ज्ञान व वनहक्क कामाचा अनुभव यासाठी ३० गुण देण्यात येतील.
३. पात्र उमेदवार यांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर दि. १८.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.
४. सदर पदावर नेमणूक केलेल्या उमेदवाराला नेमणूक संपुष्टात आल्यानंतर त्यापुढे सदर पदावर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. किंवा शासन सेवेत समाविष्ट करण्याची मागणी करता येणार नाही किंवा त्यासाठी कोणत्याही न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार असणार नाही.

**वनहक्क सहाय्यक मानधन**

Fixed Componet Honorarium रूपये- १६,०००/- (मासिक एकत्रित मानधन)

दिनांक - ०३/१२/२०१८
ठिकाण पालघर

सही/-
(डॉ. प्रशांत नारनवरे)
**जिल्हाधिकारी पालघर**